ePaper
नवनीत राणांचं सामूहिक हनुमान चालीसा पठण, महिलांची लक्षणीय गर्दी

| वर्ष - 6 | अंक - 283 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- चिंचवड पोटनिवडणूक: काँग्रेस 'एकला चलो'वर ठाम
- तीन दिवसात साडेतीन कोटींचा 'गल्ला'!
- ... तर तुमच्या आश्रमात सेवा करू
- बोम्मईंची सत्ता जाणार!

www.mahaenews.com | ।रविवार, दि. 29 जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बिनविरोधसाठी 'पॉलिटिक्स वुईथ रिस्पेक्ट'!

## » आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार : विरोधी पक्षाच्या शहराध्यक्षांना निवेदन

**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

**पिंपरी-चिंचवड शहराचे लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधन झाले. या दुःखातून जगताप कुटुंबीय आणि त्यांचे सर्वपक्षीय हितचिंतक अद्याप सावरलेले नाही. अल्पावधीत लागलेल्या पोटनिवडणुकीमध्ये आपण सर्वांनी जगताप कुटुंबीयांसोबत राहीले पाहिजे. ही निवडणूक बिनविरोध करण्याबाबत पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे**






**चिंचवड** पोटनिवडणुकीची निवडणूक आयोगाकडून घोषणा झाल्यानंतर भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी शहरातील सर्व विरोधी पक्षाच्या शहराध्यक्षांना निवेदन दिले आहे. यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान असलेले दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे दि. ३ जानेवारी २०२३ रोजी निधन झाले. या दुखा:तून अद्याप जगताप कुटुंबीय आणि त्यांचे सर्वपक्षीय समर्थक, कार्यकर्ते आणि हितचिंतक अद्याप सावरले नाही. तोच पोटनिवडणुकीची घोषणा झाली.

भूमिपूत्र म्हणून स्वर्गीय लक्ष्मण जगताप यांनी पिंपरी-चिंचवड शहरात गेले ३५ वर्षे राजकारण-समाजकारणात योगदान दिले. पक्षीय जोडे बाजुला ठेवून आपल्यासारख्या कार्यकर्त्याला वेळोवेळी ताकद आणि मार्गदर्शन करण्याची भूमिका त्यांनी ठेवली. त्यामुळे तुमच्या-माझ्यासारखे अनेक कार्यकर्ते घडले. सर्वपक्षीय नेत्यांशी तसेच केंद्र आणि राज्यातील सरकारमधील मंत्र्यांमध्ये त्यांचे सलोख्याचे संबंध होते. त्यामुळेच लक्ष्मणभाऊ पिंपरी-चिंचवडचे लोकनेते होते. तसेच, लक्ष्मणभाऊंच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदतीमुळेच तुमच्या-माझ्यासारखे कार्यकर्ते घडले. अनेकांना महापालिका आणि पक्षांच्या माध्यमातून विविध महत्वाच्या पदांवर आपल्याला संधी मिळाली. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जगताप यांच्या मदतीमुळेच शक्य झाले. हे आपल्याला विसरुन चालणार नाही, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

### निवडणूक झालीच तर लाखांच्या फरकाने जिंकू...

» पिंपरी-चिंचवडचे लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी आमदार म्हणून गेल्या १९ वर्षांत शहरात विकासाची गंगा आणली आहे. ही विकासगंगा निरंतर सुरू ठेवण्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भाजपाचाच आमदार होणार असल्याची काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. ही पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. मात्र, निवडणूक झालीच, तर हा विजय लाखाच्या फरकाने असेल. त्यासाठी चिंचवड विधानसभेच्या १३ प्रभागात आजपासूनच मैदानावर उतरून काम सुरू केले आहे, असेही आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे.

**"आज जगताप कुटुंबीय दु:खात आहे. अशा परिस्थितीत आपल्या राजकीय जीवनात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष केलेल्या मार्गदर्शनाची आणि मदतीची परतफेड करण्याची ही वेळ आहे. कारण, केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक, व्यावसायिक जीवनात त्यांनी आपल्याला वेळोवेळी मदतच केली आहे. त्यामुळे आपण सद्सद् विवेकबुद्धीने विचार करुन जगताप कुटुंबीयातून कोणत्याही उमदेवाराविरोधात आपला उमदेवार उभा करु नये, अशी एक पिंपरी-चिंचवडकर म्हणून माझी अपेक्षा आहे. महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

**- महेश लांडगे,**
शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

या पोटनिवडणुकीसाठी दि. ३१ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपा-बाळासाहेबांची शिवसेना-रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पक्षाच्या नेत्यांनी शनिवारी विरोधी पक्षाच्या शहराध्यक्षांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली. लेखी पत्र देवून निवडणूक बिनविरोध करण्याची विनंती केली आहे.

यावेळी बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, रिपाइंचे शहराध्यक्ष स्वप्नील कांबळे, भाजपचे प्रदेश सचिव अमित गोरखे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी सभागृह नेते एकनाथ पवार, नामदेव ढाके, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, मोरेश्वर शेडगे, अनुप मोरे आदी उपस्थित होते.

# चिंचवड पोटनिवडणूक: काँग्रेस 'एकला चलो'वर ठाम!

## निवडणूक बिनविरोध होण्याची आशा धूसर

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुक अधिक रंगतदार होण्याची शक्यता आहे. काँग्रेस पक्षाने एकला चलोचा नारा दिला असून चिंचवड पोटनिवडणूक लढवण्यावर ते ठाम आहेत. आम्ही पक्षश्रेष्ठीना विनंती करणार असून चिंचवड विधानसभा लढवण्यावर आम्ही ठाम असल्याचे विधान शहराध्यक्ष कैलास कदम यांनी केले आहे. काँग्रेसच्या या भुमिकेमुळे भाजपाच्या बिनविरोध पोटनिवडणुकीच्या धोरणाला खीळ बसली आहे. भाजपाचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे नुकतेच निधन झाले आहे. चिंचवड विधानसभेच्या रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक लागली आहे.**




**पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी**

**» पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकेतच भाजपाच्या बैठकीतनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असे विधान केले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील आम्ही महाविकास आघाडीच्या नेत्यांना निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी विनंती करणार आहोत असे म्हटले होते. परंतु, काँग्रेस मात्र पोटनिवडणूक लढवण्यावर ठाम आहे. आजपासून चिंचवड विधानसभेतील इच्छुकांचे उमेदवारी अर्ज घेण्यास काँग्रेस चे शहराध्यक्ष कैलास कदम यांनी सुरुवात केली आहे.**


भाजपाचे सर्व नेते चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी आग्रही आहेत. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकेतच भाजपाच्या बैठकीतनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असे विधान केले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील आम्ही महाविकास आघाडीच्या नेत्यांना निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी विनंती करणार आहोत असे म्हटले होते. परंतु, काँग्रेस मात्र पोटनिवडणूक लढवण्यावर ठाम आहे. आजपासून चिंचवड विधानसभेतील इच्छुकांचे उमेदवारी अर्ज घेण्यास काँग्रेस चे शहराध्यक्ष कैलास कदम यांनी सुरुवात केली आहे. चिंचवड विधानसभेतील पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची बैठक झाली. पक्षश्रेष्ठीची मुंबईत बैठक होणार असून तिथं माझी भूमिका मांडणार आहे. असे शहराध्यक्ष कैलास कदम यांनी सांगितले आहे. चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणूकीसाठी सर्व पक्षीय नेते तयारी करत आहेत. राष्ट्रवादी, काँग्रेस, आप आणि ठाकरे गट यांनी पोटनिवडणूक लढवणार असल्याचे संकेत दिले आहेत.

# पुरंदर विमानतळ घेणार 'उड्डाण', मुख्यमंत्री, उद्योगमंत्र्यांनी घेतला आढावा

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुण्याचे हक्काचे पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी गेल्या आठवड्यात बैठक घेतली. त्यामध्ये प्रकल्पाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. लवकरच प्रकल्पाची भूसंपादन अधिसूचना निघेल, अशी माहिती माजी मंत्री विजय शिवतारे यांनी शुक्रवारी दिली.

पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचा अहवाल राज्याच्या उच्चाधिकार समितीकडे (हाय पॉवर कमिटी – एचपीसी) पाठविण्यात आला आहे. या अहवालात समितीने काही त्रुटी काढल्या आहेत. या त्रुटी दूर करण्याचे काम सध्या सुरू आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना माजी मंत्री शिवतारे यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, 'पुरंदर विमानतळ प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्योगमंत्री सामंत यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची गेल्या आठवड्यात बैठक घेतली. त्यामुळे प्रकल्पाच्या कामाबाबत राज्य सरकार आणि प्रशासनाकडून काहीच कार्यवाही सुरू नाही असे नाही.प्रशासनाच्या पातळीवरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर राज्य सरकारकडून पुढील निर्णय घेण्यात येतील. विमानतळाबाबत मी लवकरच मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेणार आहे.' दरम्यान, पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी काही स्थानिकांनी जमिनी देण्यास नकार दिला.



## शॉर्ट न्यूज

### विद्यापीठाचे ३० जानेवारीचे पेपर पुढे ढकलले

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांच्या सर्व अभ्यासक्रमांची हिवाळी सत्राची परीक्षा सध्या सुरू आहे. नाशिक पदवीधर मतदार संघाची निवडणूक मतदान ३० जानेवारी रोजी असून, त्यासाठी काही महाविद्यालये मतदान केंद्र म्हणून जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे या एका दिवसाचे सर्व विद्याशाखांच्या सर्व अभ्यासक्रमांचे पेपर ३० जानेवारी ऐवजी रविवारी (ता.५) घेण्याचे फेरनियोजन विद्यापीठाने केले आहे. हा निर्णय विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर आणि नाशिक या तिन्ही जिल्ह्यासाठी लागू आहे. उर्वरीत सर्व पेपर नियोजित वेळापत्रकानुसार पार पडणार आहे. या संबंधीचे प्रसिद्धिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

# शेवटचा श्वास पुण्यात घ्यावा!

## » डॉ. रघुनाथ माशेलकरांची इच्छा

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

कधी शेवटचा दिवस येईल मला सांगता येणार नाही. पण, कधी शेवटचा श्वास घ्यावा लागला, तर तो पुण्यात असावा, अशी भावनिक इच्छा ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शनिवारी बालगंधर्व रंगमंदिर येथे व्यक्त केली. 'दुर्दम्य आशावादी - डॉ. रघुनाथ माशेलकर' या त्यांच्यावरीलच चरित्रग्रंथाच्या प्रकाशन कार्यक्रमात त्यांनी ही इच्छा व्यक्त केली. 'पुण्यावर माझे फार प्रेम असून, या शहराने मला घडविले आहे. मला पुण्याने प्रचंड प्रेम दिले असून, पुण्यातच शेवटचा श्वास घ्यावा', अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमाला डॉ. माशेलकर यांचे पीएच. डी. चे मार्गदर्शक प्रा. एम.एम. शर्मा, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ



**डॉ. माशेलकर हे चालतं बोलतं ज्ञानपीठ**

**» डॉ. माशेलकरांच्या ५८ वर्षांच्या वाटचालीचे साक्षीदार असलेले त्यांचे गुरू डॉ. शर्मा म्हणाले, 'माझा सहकारी आभाळाइतका मोठा झाल्याचा आनंद आहे. डॉ. माशेलकर यांच्यासारखे व्यक्तीमत्त्व दुर्मिळ आहे. तळागाळात होत असलेल्या नवसंशोधनाची भारतात फारसे कौतुक होत नाही. पण भारतातील नवसंशोधनाचे योग्य पद्धतीने कौतुक झाल्यास मोठा बदल घडेल. ते काम डॉ. माशेलकर यांनी केले आहे.' नव्या पिढीतील तरुण, उद्योगांसाठी डॉ. माशेलकर मार्गदर्शक असून, देशात विज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. देशाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यावर डॉ. माशेलकर यांनी घेतलेली भूमिका पटली.त्यांचे चरित्र हा महत्त्वाचा ऐतिहासिक दस्ताएवेज आहे, असे डॉ. काकोडकर म्हणाले. नेहमी सकारात्मकता असलेले डॉ. माशेलकर हे चालतं बोलतं ज्ञानपीठ असल्याचे गौरवोद्गार डॉ. मुजुमदार यांनी काढले.**

डॉ. विजय भटकर, सिंबायोसिस अभिमत विद्यापीठाचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. माशेलकरांच्या पत्नी वैशाली माशेलकर, पुस्तकाचे लेखक डॉ. सागर देशपांडे आणि सह्याद्री प्रकाशनच्या संचालिका स्मिता देशपांडे आदी उपस्थित होते.

माशेलकरांनी यावेळी तीन इच्छा व्यक्त केल्या. ते म्हणाले, 'मला पुनर्जन्म मिळाला, तर तीच आई, तीच पत्नी, तेच मुले आणि तेच मित्र मिळावे, खडतर असला तरी हा प्रवास पुन्हा करायचा आहे. तसेच, माझं उर्वरित आयुष्य देवाने घेतले तरी चालेल. पण २०४७ ला शंभरीतला भारत कसा आहे, हे पाहण्यासाठी एक दिवस मला द्यावा.' डॉ. माशेलकरांच्या ५८ वर्षांच्या वाटचालीचे साक्षीदार असलेले त्यांचे गुरू डॉ. शर्मा म्हणाले, 'माझा सहकारी आभाळाइतका मोठा झाल्याचा आनंद आहे. डॉ. माशेलकर यांच्यासारखे व्यक्तीमत्त्व दुर्मिळ आहे. तळागाळात होत असलेल्या नवसंशोधनाची भारतात फारसे कौतुक होत नाही. पण भारतातील नवसंशोधनाचे योग्य पद्धतीने कौतुक झाल्यास मोठा बदल घडेल. ते काम डॉ. माशेलकर यांनी केले आहे.' नव्या पिढीतील तरुण, उद्योगांसाठी डॉ. माशेलकर मार्गदर्शक असून, देशात विज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. देशाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यावर डॉ. माशेलकर यांनी घेतलेली भूमिका पटली.त्यांचे चरित्र हा महत्त्वाचा ऐतिहासिक दस्ताएवेज आहे, असे डॉ. काकोडकर म्हणाले. नेहमी सकारात्मकता असलेले डॉ. माशेलकर हे चालतं बोलतं ज्ञानपीठ असल्याचे गौरवोद्गार डॉ. मुजुमदार यांनी काढले. ते म्हणाले, 'पुण्यात झालेल्या विज्ञान काँग्रेसमध्ये डॉ. माशेलकर यांनी पंचशील दिली. विद्यार्थी केंद्रित शिक्षण, महिला केंद्रित कुटुंब, मानवकेंद्रीत विकास, नवकल्पना आणि नवकल्पनाधारीत भारताचे पंचशील त्यांनी सांगितले.

# तीन दिवसात साडेतीन कोटींचा 'गल्ला'!

## » इंद्रायणी थडी : महिला बचत गटांमध्ये उत्साह, प्रेक्षकांच्या गर्दीला उधाण

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महिला सक्षमीकरण आणि नवोदितांना संधी या हेतूने सुरू केलेल्या 'इंद्रायणी थडी- २०२३' महोत्सवाला पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातून प्रेक्षकांचा प्रतिसाद वाढला आहे. सुरुवातीच्या तीन दिवसांत तब्बल २० लाखहून अधिक नागरिकांनी महोत्सवाला भेट दिली असून, साडेतीन कोटींहून अधिक रुपयांची उलाढाल झाली आहे, अशी माहिती समन्वयक संजय पटनी यांनी दिली.**



आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि शिवांजली सखी मंचच्या पुढाकाराने भोसरी येथील गावजत्रा मैदानावर एकूण १७ एकर जागेत भव्य इंद्रायणी थडी- २०२३ महोत्सव सुरू झाला. गेल्या दोन वर्षांत कोविड महामारीमुळे महोत्सव झाला नाही. त्यामुळे यावर्षी महोत्सवाला प्रचंड गदी पहायला मिळत आहे.

महोत्सवात एकूण १ हजार महिला बचतगटांनी विविध स्टॉल लावले आहेत. खाद्य पदार्थ, सौंदर्य प्रसाधने, जीवनावश्यक वस्तू, खेळणी, पुस्तक स्टॉल, घरगुती वापरासाठी विविध छोटी यंत्रे, पर्यावरण पुरक वस्तू, कपडे, परंपरीक पोषाख, यासह विविध १५० प्रकारच्या स्टॉलवर ग्राहकांनी खेरदीला पसंती दिली आहे. खाद्य पदार्थांच्या स्टॉलवरील उलाढाल लक्षवेधी असून, बचत गटांच्या प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे, सवलतीच्या दरामध्ये पिण्याचे पाणी अर्थात वॉटर बोटल्स उपलब्ध आहेत.

### 'सेलिब्रेटी'मुळे महोत्सवाची राज्यभरात चर्चा...

» 'इंद्रायणी थडी- २०२३' महोत्सवाचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील नामांकीत व्यक्ती उपस्थित होते. भाजपा महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्यासह आजी-माजी खासदार, आमदार, राजकीय पदाधिकारी यांनी महोत्सवाला भेट देत आहेत. तसेच, महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत चर्चेत आलेला पैलवान सिकंदर शेख यांच्यासह कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली आहे. दुसरीकडे, मनोरंजन क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेते पुष्कर श्रोत्री, स्वप्नील जोशी यांच्यासह प्रथमेश परब, मराठी सिनेतारखा, चला हवा येवू द्या, महाराष्ट्राचे विनोदवीर अशा विविध 'सेलिब्रेटीं'मुळे इंद्रायणी थडी- २०२३ महोत्सवाची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रभरात होत आहे.

---

# 'भाजयुमो'च्या वतीने मोफत रुग्णवाहिका सेवा

## » दिवंगत जगताप यांच्या स्मरणार्थ उपक्रम : शहराध्यक्ष चोंधे, सचिव बंदी यांचा पुढाकार

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराचे लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या स्मरणार्थ भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने मोफत रुग्णवाहिका सेवा लोकार्पण करण्यात आली. याद्वारे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी पुढाकार घेत जिल्ह्यातील सर्वात मोठे "महाआरोग्य शिबीर" आयोजित करणारे दिवंगत आमदार जगताप यांचा रुग्णसेवेचा वसा कायम ठेवण्याचा संकल्प करण्यात आला.**



रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्याचे आयोजन भाजयुमोचे सचिव सचिन बंदी यांनी केले. यावेळी भारतीय जनता पार्टी दक्षिण भारतीय आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश अण्णा पिल्ले, भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र सहसंयोजिका युवती विभाग वैशाली खाडये, भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष संकेत चोंधे, उपाध्यक्ष सोमनाथ भोंडवे, सरचिटणीस तेजस्विनी कदम, नवनाथ भाऊ जांभुळकर, सुधीर भाऊ वाल्हेकर, निरंजन राऊत, तेजस फाळके, दिनेश जगताप, चेतन साबळे, समिर साबळे, जगदिश महाले, अशितोष शेळके, अक्षय मोरे, माऊली गावडे, आरती बंदी, युवराज धोत्रे, अक्षय सोनार, पंकज ठाकूर, सागर शोनू, औदुंबर कळसाईत, कैलास हिरेमठ, ज्येष्ठ नागरिक गोविंद घटोल, प्रमोद हिवाळे आदी उपस्थित होते.

संकेत चोंधे म्हणाले की, स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांनी आम्हा नवोदित कार्यकर्त्यांना कायम लोकांच्या हितासाठी काम करीत राहण्याचे संस्कार दिले आहेत. त्याच्या विचारांचा वारसा चालवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

परिसरातील सामान्य कुटुंबातील नागरिकांना आपातकालीन परिस्थितीत तात्काळ रुग्णवाहिका सेवा मोफत उपलब्ध करण्यासाठी युवा मोर्चातर्फे पुढाकार घेण्यात आला, ही निश्चितच समाधानाची बाब आहे.

---

# जगताप घराण्याप्रती आदर पण, निर्णय राज्यपातळीवर!

## » चिंचवड पोटनिवडणूक : राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे पिंपरी-चिंचवड शहराचे लोकनेते होते. त्यांच्या निधनाचे आम्हालाही दुख: असून त्यांच्याबद्दल आम्हाला आदरच आहे. परंतू भाजपविरोधातील जनभावना आणि राज्यात झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये भाजपने घेतलेली स्वार्थी भूमिका लक्षात घेऊन चिंचवड विधानसभेची पोटनिवडणूक लढविण्याची भूमिका स्थानिक पातळीवर घेण्यात आली असून अंतिम निर्णय वरिष्ठ नेते घेणार आहेत. राज्यपातळीवर जो निर्णय घेतला जाईल त्यानुसार पुढील दिशा ठरविली जाईल, अशी माहिती राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिली आहे.

भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या वतीने चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध करण्याबाबतची पत्राद्वारे विनंती केल्यानंतर गव्हाणे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. याबाबत त्यांनी एक निवेदन जारी केले असून त्यात म्हटले आहे की, दिवंगत आमदार लक्ष्मण भाऊ यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे. ते सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्यरत होते. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी जगताप यांना वेळोवेळी मदत केली होती. नगरसेवक, महापौर, आमदार बनविण्यामध्ये राष्ट्रवादीने महत्त्वाची भूमिका बजावली होती. हे सर्वांनाच माहित आहे. जगताप यांचे निधन झाल्यामुळे चिंचवडची पोटनिवडणूक होत आहे. यापूर्वी पंढरपूरचे राष्ट्रवादीचे आमदार भारत भालके यांचे निधन झाल्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी भाजपकडे वारंवार विनंती करूनही त्यांनी सदर निवडणूक बिनविरोध केली नव्हती.

संपादकीय »

# जागर लोकशाही मूल्यांचा

***लोकशाही परिपक्व व्हावी, नागरिकांना त्यांचे हक्क, अधिकार आणि जबाबदारी यांची जाणीव व्हावी, या हेतूने प्रजासत्ताकदिनापासून (ता.२६) ३० जानेवारीपर्यंत 'लोकशाही उत्सव' होतो आहे. या उपक्रमामागील भूमिका विशद करणारा लेख.***

स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीनिमित्ताने आपल्या वाटचालीचा, लोकशाहीच्या अंमलबजावणीचा मागोवा घेणे महत्त्वाचे आहे. प्रजासत्ताकदिन तोंडावर असताना स्वातंत्र्याचा जमा-खर्च मांडताना जमेच्या तुलनेत खर्चाचे- आव्हानांचे पारडे जड झालेले दिसते. कोरोना महासाथीचा सामना करताना सार्वजनिक आरोग्य यंत्रणेला, त्याचप्रमाणे सरकारी सार्वजनिक सेवांना पर्याय नाही, हे वास्तव ठळकपणे अधोरेखित झाले.

कोरोनाचा सामना करताना सर्वसामान्य नागरिकांनी अनेकदा सामाजिक जबाबदारीचे, माणुसकीचे दर्शन घडवले या जमेच्या बाजू. मात्र केंद्र शासनाने अत्यंत अनियोजितपणे आणि घाई-घाईने लादलेल्या ठाणबंदीमुळे मुळातच कमकुवत झालेल्या ग्रामीण आणि शहरीही अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले, लाखो कष्टकरी रोजगार गमावल्याने देशोधडीला लागले. बेरोजगारीचा प्रश्न बिकट झाला.स्त्रिया आणि मुलांवरील घरात आणि घराबाहेरील हिंसेमध्ये वाढ झाली. कोरोनामुळे बिघडलेले आर्थिक-सामाजिक स्वास्थ्य अद्यापही सावरलेले नाही. असे असतानाही केंद्र सरकारने लोकशाही प्रक्रिया आणि मूल्ये धाब्यावर बसवून पर्यावरणीय आणि शेतीसंबंधी कायद्यांमध्ये केलेले कॉर्पोरेट-धार्जिणे बदल, त्यांच्या विरोधात उसळलेल्या आंदोलनांना दंडुकेशाहीच्या जोरावर चिरडण्याचे आणि दडपण्याचे प्रयत्न केले. सत्ताधारी सरकारच्या जबाबदार नेत्याने 'लोकशाही थोडी जास्तच झाली' असे वक्तव्य करून भारतीय लोकशाही धोक्यात असल्याचे स्वीडनच्या व्ही-डेम इन्स्टिट्यूटचे निरीक्षण योग्य असल्याचे दाखवून दिले.भारतासारख्या लोकशाहीमध्ये नागरिकांना गळचेपीविरोधात आवाज उठवण्याचा, स्वत:चे प्राधान्यक्रम मांडण्याचा घटनादत्त हक्क असतो. त्यामुळेच भारतातील लोकशाहीचे भवितव्य निराशाजनक नाही, असे गेल्या काही महिन्यांमधील घडामोडींचा आढावा घेताना म्हणावे लागते. लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनांपुढे सत्ताधाऱ्यांनाही नमते घ्यावे लागले आहे. अमेरिकेतही डोनाल्ड ट्रम्पच्या एकाधिकारशाहीला जनतेच्या कौलामुळे पायउतार व्हावे लागले. विविध राजकीय, आर्थिक हितसंबंधांपोटी लोकशाही मूल्यांची पायमल्ली वेळोवेळी होत असते. मात्र लोकशाही मूल्यांचा सातत्याने जागर करणे, ती प्रत्यक्षात आणण्यासाठी वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर प्रयत्नशील राहणे यातूनच लोकशाही विविध आव्हाने पचवून बळकट होते.

# 'ती'च्या हाती व्यवसायाची दोरी






कौटुंबिक व्यवसाय चालविण्यासाठी मुलगाच सक्षम आणि अधिक योग्य आहे, हा पूर्वापार चालत आलेला समज आता कायमचा हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. समाजाने कितीही प्रगती केली असली, तरी मुलगी हे परक्याचे धन मानणारी अनेक मंडळी आजही मान वर करून मिरवताना दिसतात. मात्र, गेल्या काही दिवसांतील उदाहरणे पाहिली असता कौटुंबिक व्यवसाय चालविण्यासाठी पुढच्या पिढीतील मुलांऐवजी मुलींवरच विश्वास टाकण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींच्या यादीत पहिल्या दहा क्रमांकांत असणाऱ्या बर्नार्ड अरनॉल्ट यांनी ७२.४ हजार कोटी रुपये बाजारमूल्य असणाऱ्या 'डायर' या लक्झरी वस्तूंच्या ब्रँडची धुरा मुलगी डेल्फिनकडे सोपवित असल्याचे नुकतेच जाहीर केले. डेल्फिन एक फेब्रुवारीपासून ही धुरा सांभाळणार आहे. डेल्फिन यांनी या पूर्वी अरनॉल्ट यांच्या अन्य एका व्यवसायाची जबाबदारीही यशस्वीरीत्या सांभाळली होती.

पित्याच्या उद्योगाचा मुलींनी सांभाळणे आपल्या देशातही काही नवीन बाब राहिलेली नाही. देशातील अनेक बड्या उद्योगपती घराण्यांनी मोठ्या विश्वासाने ही परंपरा मुलींच्या हाती सोपवली आहे. 'रिलायन्स उद्योगसमूहा'च्या मुकेश अंबांनी यांच्यापासून ते उद्योगपती कुमारमंगलम बिर्ला यांच्यापर्यंत सर्वच भारतीय उद्योगपतींची नावे आपण या ना त्या कारणाने नेहमीच वाचतो, ऐकतो. जिद्द आणि चिकाटीच्या बळावर अब्जाधीश रुपयांची उलाढाल करणाऱ्या या उद्योजकांच्या मुलीही काही कमी नाहीत. त्यांनीही घरातून मिळालेला वारसा पुढे नेऊन वडिलांचे नाव मोठे केले आहे.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासानुसार, देशातील २४ टक्के कौटुंबिक व्यवसाय मुली किंवा महिलांच्या हाती असून, ७६ टक्के महिला वडिलांचा आणि २४ टक्के महिला पतीचा व्यवसाय सांभाळत आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे ईशा अंबानी-पिरामल. ईशा ही 'रिलायन्स इंडस्ट्रीज'चे सर्वेसर्वा आणि जगातील श्रीमंत व्यक्तींपैकी एक असणाऱ्या मुकेश अंबानी यांची मुलगी. ईशाने २०१४मध्ये 'रिलायन्स जिओ' आणि 'रिलायन्स रिटेल' या बड्या उद्योगांची जबाबदारी स्वीकारली. सध्या 'जिओ' ४२.१३ कोटी ग्राहकांसह देशातील प्रमुख आणि मोठी दूरसंचार कंपनी बनली आहे. 'जिओ'ला अल्पावधीतच देशातील अव्वल क्रमांकाची दूरसंचार कंपनी म्हणून घडविण्यात ईशाचा मोठा वाटा आहे. 'रिलायन्स रिटेल' हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत मोठा रिटेलर बनला आहे.

वास्तविक पाहता 'जिओ'ची मुहूर्तमेढ रोवण्याची कल्पनाही ईशाचीच. २०११मध्ये ईशा घरूनच 'येल युनिव्हर्सिटी'च्या कागदपत्रांची जुळवाजुळव करीत असताना आपले इंटरनेट अतिशय मंद असल्याचे लक्षात **आले. त्यानंतर तिने आपली अडचण मुकेश यांच्या कानावर घालून आपणच दूरसंचार कंपनी चालू करावी, असा विचार मांडला. ही समस्या लक्षात घेऊन आणि नव्या व्यवसायातील संधी हेरून मुकेश अंबानी यांनी २०१६मध्ये 'जिओ'ची कल्पना सत्यात उतरवली. २०१४मध्ये ईशाने भाऊ आकाशसह 'रिलायन्स'च्या संचालक मंडळात पाऊल ठेवले. त्यानंतर तिने 'रिलायन्स' समूहाला पुरुषी मानसिकतेतून बाहेर काढून महिलांच्या नेतृत्त्वगुणाला संधी देण्याचे ठरवले; त्यामुळे आजच्या घडीला 'रिलायन्स'मध्ये महिलांची संख्या वाढली आहे. 'रिलायन्स इंडस्ट्रीज'च्या स्थापनेपासून कंपनीत महिलांचे प्रमाण नगण्य होते. ही स्थिती ईशाच्या आगमनानंतर बदलण्यास सुरुवात झाली. कंपनीत एंट्री झाल्यानंतर ईशाने मागे वळून पाहिलेच नाही. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ईशाच्या नावाचा 'फोर्ब्ज'च्या 'टॉप टेन बिलिनेयर'मध्ये समावेश झाला. २०१८मध्ये ईशा 'पिरामल उद्योगसमूहा'च्या आनंद पिरामल यांच्याशी विवाहबद्ध झाली. सध्या ईशाची वार्षिक कमाई सुमारे चार हजार ७१० कोटी रुपये आहे.पुण्यातील 'एमक्युअर फार्मा' या औषधनिर्मिती कंपनीच्या सीईओ अर्थात मुख्य कार्यकारी अधिकारी असणाऱ्या नमिता थापर या आज यशस्वी महिला उद्योजक म्हणून ओळखल्या जातात. एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या नमिता यांची ही झेप थक्क करणारी आहे.**

# तरुणाईची लोकसंख्या घटतेय!

**लोकसंख्या कमी करण्यासाठी जन्मदर आणखी खाली आणता येईल असे काही अभ्यासकांना वाटत असले तरी हे लक्षात घेण्यासारखे आहे की अनेक देशांमध्ये विकासाचे चाक फिरवणाऱ्या तरुणांची लोकसंख्या कमी होत आहे. तज्ज्ञांच्या मते जन्मदर एका पातळीच्या पुढे कमी करता येत नाही, अन्यथा भविष्यात तरुणाई कमी पडू लागेल. म्हणजेच लोकसंख्येचा मुद्दा तितकासा सोपा नाही.**

सध्या जगभरातील लोकसंख्येने आठ अब्जाचा आकडा पार केला आहे. गेल्या काही दशकांपासून वाढत्या लोकसंख्येवर आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंता व्यक्त केली जात आहे. लोकसंख्या नियंत्रण उपायांवरही अनेक वर्षांपासून चर्चा होत आहे. हे होत असताना लोकसंख्या वाढीच्या नव्या आकडेवारीवर विचार व्हायला हवा. या बाबीकडे दुर्लक्ष होताना दिसते. कारण गेल्या काही दशकांत जगातील जन्मदरसुद्धा कमी होत चालला आहे आणि ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

लोकसंख्येच्या विश्लेषणात असे समोर आले आहे की १९५० नंतर जन्मदर हा सर्वात कमी पातळीवर आहे. म्हणजेच गेल्या दशकांमध्ये लोकसंख्या नियंत्रणाचे उपाय प्रभावी ठरले आहेत, यावर आपण समाधानी राहू शकतो. अशा परिस्थितीत अपेक्षेपेक्षा लोकसंख्या का वाढत आहे,



असा प्रश्न उपस्थित होणे साहजिकच आहे. जगभरातील सरकारांनी केलेल्या चांगल्या कामांमुळे नागरिकांचे सरासरी आयुर्मान वाढले, असे उत्तर दिले जात आहे. लोकसंख्येच्या वाढीचे कारण आरोग्यसेवेतील वाढ आणि राहणीमानात झालेली सुधारणा हेच असेल, तर आता लोकसंख्येचा नवा आकडा कशाच्या आधारावर मांडणार याची खंत आपण बाळगणार आहोत का, हा खरा प्रश्न आहे.

अनेक देशांच्या सरकारांना त्यांच्या नागरिकांच्या किमान गरजा पूर्ण करणे फार कठीण जात आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. पाणी आणि अन्नाचा तुटवडा असो किंवा वाहनांचे प्रदूषण असो, अशा समस्यांसाठी दिलेली सर्वात सोपी कारणे म्हणजे वाढती लोकसंख्या, पण जर जगात जन्मदराचे लक्ष्य कमी-अधिक प्रमाणात साध्य झाले असेल, तर प्रश्न सोडवण्यासाठी दुसरा कोणता मार्ग असू शकतो? त्यांच्या किमान आकारमानाच्या लोकसंख्येच्या किमान गरजा पूर्ण करण्यासाठी विकासाचे नवे मॉडेल शोधणे हे जगभरातील विकासतज्ज्ञांसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे.लोकसंख्या कमी करण्यासाठी जन्मदर आणखी खाली आणता येईल असे काही अभ्यासकांना वाटत असले तरी हे लक्षात घेण्यासारखे आहे की अनेक देशांमध्ये विकासाचे चाक फिरवणाऱ्या तरुणांची लोकसंख्या कमी होत आहे. तज्ज्ञांच्या मते जन्मदर एका पातळीच्या पुढे कमी करता येत नाही, अन्यथा भविष्यात तरुणाई कमी पडू लागेल. म्हणजेच लोकसंख्येचा मुद्दा तितकासा सोपा नाही. आपल्या देशाचा विचार करता वाढत्या लोकसंख्येच्या ट्रेंडमध्ये

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ... तर तुमच्या आश्रमात सेवा करू

## बागेश्वर बाबांना जादूगरांचं चॅलेंज, मनातलं ओळखत असल्यामुळे बालाजी प्रसन्न असल्याचा दावा

।मुंबई । महाईन्यूज ।

**बागेश्वर धाम येथील मठाधिपती धीरेंद्र शास्त्री (DHIRENDRA SHASTRI) उर्फ बागेश्वर बाबा गेल्या काही दिवसांपासून चांगलेच चर्चेत आहेत. लोकांच्या मनात काय सुरु आहे, हे ते ओळखत असल्याचा दावा करतात. त्यांना लोकांच्या समस्या न सांगताच समजतात. त्या समस्यांचे उत्तर ते कागदावर लिहून देतात. त्यामुळे त्यांचा दरबारात देशभरातून अनेक जण येत आहेत. बागेश्वर महाराज यांच्या दाव्यावर मोठी चर्चा सध्या सुरु आहे. त्यातच अंधश्रद्धा निर्मूलन समितीने त्यांना आव्हान दिल होते. आता, एका जादुगारानेही बागेश्वर बाबांना आव्हान दिलं आहे.**

बागेश्वर बाबा मनातलं ओळख असल्यामुळे बालाजी प्रसन्न असल्याचा दावा त्यांनी केला आहे. मात्र, मनातलं ओळखणं ही एक कला असून 'माईंड रीडर' सुहानी शाह देखील चर्चेत आली आहे. त्यानंतर, आता देशातील प्रसिद्ध जादूगार शिव कुमार यांनी धीरेंद्र शर्मा यांना आव्हान दिलं आहे. जगात कुठेही दिव्यशक्ती नसून जादू हीच एक विद्या असल्याचं त्यांनी म्हटलं. जादू ही अलौकीक किंवा चमत्कार नसून ते विज्ञान कलेचं रुप आहे. आम्ही ज्या पद्धतीने ते दाखवून देतो, त्यातून ही जादू असल्याचा भास समोरच्या व्यक्तींना होतो, असेही शिवकुमार यांनी म्हटले आहे.





मेडिटेशन, योगा आणि बहुरंगी कलांचा समावेश जादूच्या कलेत आहे. मिक्स आर्ट किंवा जादू असंही या कलेला म्हटलं जातं. अलवर येथे जादूचा शो करत असताना शिव कुमार यांनी बागेश्वर धामच्या महाराजांना आव्हानच दिलं आहे. जादूगरांसमोर तुमची दिव्य शक्ती किंवा अलौकिक शक्ती दाखवा, सिद्ध करा. तसे केल्यास सर्वच जादूगार तुमच्या आश्रमात सेवा देतील, असे चॅलेंज जादूगार शिव कुमार यांनी बागेश्वर बाबांना केलं आहे. विशेष म्हणजे देशातील सर्वच जादूगरांना २८ जानेवारी रोजी त्यांनी अलवर येथे बोलावले आहे. दरम्यान, सनातन धर्मात देव आहे, आणि देव असायला पाहिजे. मात्र, देवाच्या नावाने चमत्कार ही अंधश्रद्धा आहे, असेही जादूगार शिव कुमार यांनी म्हटले.

### अनेक स्थितंतरे पाहिलीत

» सुहानी शाह प्रसिद्ध माइंड रीडर आहे. वयाच्या सातव्या वर्षापासून लोकांच्या मनात काय सुरु आहे, ते ओळखण्याचे काम त्या करत आहेत. यासंदर्भात तिने अनेक लाईव्ह शो केले आहेत. फक्त पहिलीपर्यंत शिक्षण सुहानीचे झाले आहे. ६० विद्यार्थ्यांसोबत राहण्यापेक्षा ६० हजार लोकांसमोर कार्यक्रम घेण्याचा तिच्या वडिलांनी सल्ला दिला. त्यानंतर शाळा सोडली अन् लाईव्ह शो करुन लोकांचे मन ओळखू लागल्या.

# थंडीमुळे मुंबईतील विजेची मागणी घटली

## » थंडीचा प्रभाव : मुंबईकर थंडीमुळे रात्री एसी आणि पंखे बंद ठेवतात...



।मुंबई। महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून दमट असलेल्या मुंबईत खरोखरच थंडी होती. कपाटातून स्वेटर बाहेर आल्यावर लोक रस्त्याच्या कडेला शेकोटीत हात भाजतानाही दिसत होते. थंडीचा प्रभाव असा आहे की, रात्री एसी तर सोडाच, पंख्याचा वाराही आणखीनच बिकट बनू लागला आहे.**

हवामानाच्या या बदलाचा आणखी एक परिणाम झाला आहे. मुंबईतील विजेच्या मागणीत अचानक घट झाली असून, थंडीमुळे बहुतांश मुंबईकर रात्रीच्या वेळी एसी आणि पंखे बंद ठेवत आहेत. उन्हाळ्यात विजेची मागणी निम्मी असते. गेल्या काही दिवसांपासून मुंबईत 1900-2200 मेगावॅट विजेची मागणी असल्याचे वीजपुरवठा कंपन्यांनी सांगितले. यापैकी दक्षिण मुंबईची मागणी 350 ते 450 मेगावॅट इतकी आहे. बेस्टचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्र यांच्या म्हणण्यानुसार, 'गेल्या काही दिवसांपासून विजेची मागणी कमी झाली आहे. बेस्टची ग्राहकांची मागणी सध्या 350-450 मेगावॅट आहे. मुंबईत बेस्टचे 10.80 लाख ग्राहक आहेत. कफ परेड ते सायनपर्यंत बेस्टकडून वीजपुरवठा केला जातो. उन्हाळ्यात विजेची मागणी 900-950 मेगावॅट असते.

### तापमान कमी झाले, थंडी वाढली

» गेल्या काही दिवसांपासून रात्रीचे तापमान 15-16 अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. यंदाच्या हंगामात किमान तापमान 14.8 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले आहे. मुंबई उपनगर आणि एमएमआरमध्येही हीच स्थिती आहे. विरार, कल्याण, कर्जत या भागात मुंबईपेक्षाही जास्त थंडी आहे. वीज क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते पश्चिम आणि पूर्व उपनगरातही मागणी घटली आहे. येथे अदानी समूहाकडून वीजपुरवठा केला जातो. सध्या येथील विजेची मागणी १३५०-१४५० मेगावॅट आहे, तर पीक सीझनची मागणी २०००-२१०० मेगावॅट आहे. शहरातील अनेक भागांना टाटा पॉवरकडून वीजपुरवठा केला जातो.

### एका दिवसात वाढलेले तापमान

» शुक्रवारी कुलाबा येथे ३१ अंश सेल्सिअस तर सांताक्रुझ येथे ३४.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. एका दिवसात तापमानात 5 अंशांनी वाढ झाल्याने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन हवामान खात्याने केले आहे.शाळा सोडली अन् लाईव्ह शो करुन लोकांचे मन ओळखू लागल्या

### एसी चालला नाही, मग मागणी कशी

मुंबईतील दमट हवामानात एसीमुळे सर्वाधिक वीजवापर होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

अनेक शहरांमध्ये तापमान इतके घसरते की हिटर आणि गिझर चालू होतात, त्यामुळे वीज पुरवठ्यात फारसा फरक पडत नाही, पण मुंबईतील लोकांना हीटर लावण्याची सवय नाही. पालघर, नवी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील गावांमध्ये तापमानात आणखी घसरण झाली. यापैकी दक्षिण मुंबईची मागणी 350 ते 450 मेगावॅट इतकी आहे.

बेस्टचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्र यांच्या म्हणण्यानुसार, 'गेल्या काही दिवसांपासून विजेची मागणी कमी झाली आहे.

# संतोष बांगर यांच्या अडचणीत वाढ!



**हिंगोली :** शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांच्या मारहाणीचे दमदाटीचे व्हिडिओ सातत्याने समोर येत आहेत. अशातच पुन्हा एकदा आमदार संतोष बांगर यांचा मारहाणीचा एक व्हिडीओ समोर आला. हिंगोली शहराजवळ असलेल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्राचार्य अशोक उपाध्याय यांना आमदार संतोष बांगर यांनी शिवीगाळ करत मारहाण केली. दरम्यान या मारहाण प्रकरणी शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांच्यासह त्यांच्या 30 ते 40 कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राचार्यांना मारहाण केल्याप्रकरणी या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तर महाविद्यालयातील पाच अधिकाऱ्यांवरही या संदर्भातील गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हिंगोली शहराजवळ असलेल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्राचार्य अशोक उपाध्याय यांना आमदार संतोष बांगर यांनी शिवीगाळ करत मारहाण केली होती.


डॉक्टर अशोक उपाध्याय असे आमदार बांगर यांनी मारहाण केलेल्या प्राचार्यांचे नाव आहे.

# बोम्मईंची सत्ता जाणार!

## कर्नाटकात भाजप हरणार, शरद पवारांचे कोल्हापुरातून भाकीत

। बंगळुरू । महाईन्यूज ।

**काँग्रेस आणि जेडीएसचे सरकार फोडून सत्ता स्थापन केलेल्या कर्नाटकमध्ये बोम्मईंचे सरकार पुढील निवडणुकीत पराभूत होणार असल्याचे भाकीत शरद पवार यांनी कोल्हापुरात केले आहे. कोल्हापूर दौऱ्यावर असलेल्या शरद पवार यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी लोकसभा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका एकत्र घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. तशी चर्चा आहे. त्यावर आपले काय मत आहे? असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला. यावर, लोकसभा आणि विधानसभा एकत्र होतील असे काही लोकांचे मत आहे. पण त्याची विश्वासार्ह माहिती माझ्याकडे नाही, असे शरद पवार यांनी सांगितले.**



तसेच काही सर्व्हेच्या जनमत चाचणीवर स्पष्ट शब्दांत भाष्य केले.

याचबरोबर कर्नाटकच्या आगामी निवडणुकीवर पवारांनी भाष्य केले. "आगामी राज्यांच्या निवडणुकांत कर्नाटकात भाजपची सत्ता येणार नाही, असे स्पष्ट संकेत आहेत.

आम्ही विरोधी पक्षांना एकत्र करून एकसंघ आघाडी स्थापन करण्याचे प्रयत्न करत आहोत. परंतु सर्व राज्यांमध्ये वेगवेगळे स्थानिक प्रश्न आहेत ज्यांना सामोरे जाणे आवश्यक आहे.", असे पवार म्हणाले.

बहुमताचा आकडा सत्ताधाऱ्यांच्यासोबत राहणार नाही, असे चित्र या सर्व्हेतून दिसत आहे. तो सर्वे मी वाचला. आता जे सत्ताधारी आहेत, त्यांच्याविरोधात देशात जनमत आहे.

महाराष्ट्रातील आकडेवारी पाहता सत्ताधारी पक्षाच्या हातात सत्ता राहील असे वाटत नाही. यापूर्वीचे सर्व्हे पाहिले. पाच ते दहा वर्षांपूर्वीचे याच एजन्सीने केलेले सर्व्हेही पाहिले तर या एजन्सीचे आकडे खरे ठरले आहेत. या एजन्सीने एकप्रकारे ही दिशा दाखवली आहे. ही दिशा सत्ताधारी पक्षाला सोयीचे आहे असे वाटत नाही, असे शरद पवार यांनी सांगितले.

### परिवर्तन करण्यास लोक उत्सुक

**» या सर्व्हेतून देशात काँग्रेसचे आकडे वाढतील असे स्पष्ट दिसत आहे. कर्नाटकात भाजपचे राज्य राहणार नाही. तिथे परिवर्तन करण्यास लोक उत्सुक आहेत. असे चित्र सर्वत्र दिसत आहे. पण उत्तर प्रदेश हे मोठे राज्य आहे. त्याची आकडेवारी आलेली नाही, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.**

## महाराष्ट्र एनसीसी संचालनालय देशात प्रथम ‘प्रधानमंत्री बॅनर’ चा मान

।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्र नॅशनल कॅडेट कॉर्प्स (एनसीसी) संचालनालयाने प्रतिष्ठेच्या ‘प्रधानमंत्री बॅनर’चे विजेतेपद पटकविले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज महाराष्ट्राला हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राने सलग दोन वर्ष प्रधानमंत्रीबॅनर पटकाविण्याची कामगिरी केली आहे.

दिल्लीतील करीअप्पा मैदानावर आयोजित एनसीसी रॅलीत मोदी यांच्या हस्ते ‘प्रधानमंत्री बॅनर’ 2022-23 च्या विजेत्या व उपविजेत्यासह एनसीसीच्या बेस्ट कॅडेट्सना सन्मानित करण्यात आले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, एनसीसीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल गुरबीरसिंग आदी उपस्थित होते. महाराष्ट्र एनसीसीची सुकन्या राणा दिवे, सिनियर अंडर ऑफिसर देवेंद्र बडगुजर, संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल वाय.पी.खंडुरी यांनी पंतप्रधानांच्या हस्ते विजेतेपदाचा करंडक स्विकारला.

देशातील एकूण 17 एनसीसी महासंचालनालयाच्या डिसेंबर 2021 ते नोव्हेंबर 2022 मधील विविध स्तरावरील मुल्यांकन तसेच यावर्षी 1 ते 28 जानेवारी दरम्यान दिल्लीत आयोजित प्रजासत्ताक दिन शिबिरात महाराष्ट्राला विजेत्याचा तर तमिळनाडू, पुद्दूचेरी आणि अंदमान एनसीसी संचालनालयास उपविजेतेपदाचा बहुमान प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाला यापूर्वी एकूण 18 वेळा प्रधानमंत्री बॅनरचा बहुमान मिळाला आहे. मात्र,गेल्या सात वर्षांपासून महाराष्ट्र उपविजेता किंवा पहिल्या तीन क्रमांकात नसायचा. मात्र राज्याने मागील वर्षी हा प्रधानमंत्री बॅनरचा मान पटकाविला होता. यंदा



## 10 वर्षांचं प्रेम! फेसबुकवर ओळख झाली, लग्न करण्यासाठी 'ती' थेट स्वीडनहून भारतात आली

### » सातासमुद्रापार आलेल्या एका प्रेयसीने भारतीय संस्कृतीनुसार आपल्या प्रियकराशी केले लग्न

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रेमाला सीमा नसते असं म्हणतात. असाच काहीसा प्रकार उत्तर प्रदेशच्या एटा जिल्ह्यात पाहायला मिळाला. सातासमुद्रापार स्वीडनहून आलेल्या एका प्रेयसीने भारतीय संस्कृतीनुसार आपल्या प्रियकराशी लग्न केल्याची घटना घडली आहे. शुक्रवारी पार पडलेला हा अनोखा विवाह सोहळा पाहण्यासाठी आजूबाजूच्या लोकांनी गर्दी केली होती. आता हा विवाह परिसरात चर्चेचा विषय झाला आहे.**



स्वीडनहून एक तरुणी एटा जिल्ह्यातील अवगड शहरात पोहोचली. पवन या तरुणावर तिची फेसबुकवर ओळख झाली होती. दहा वर्षांपासून त्यांचं प्रेम होतं. दोघांनीही हिंदू रितीरिवाजाने लग्न केले.


अवगड शहरातील रहिवासी असलेले गीतम सिंग हे मोटरसायकल दुरुस्तीचे काम करतात. त्यांचा मुलगा पवन बीटेक केल्यानंतर डेहराडूनमध्ये नोकरी करतो. पवनची फेसबुकच्या माध्यमातून क्रिस्टनशी ओळख झाली आणि हळूहळू त्यांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. दोघेही फोन आणि व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून सतत बोलू लागले.

एक वर्षापूर्वी पवन आग्रा येथे गेला आणि तिला भेटला, जिथे दोघांनी प्रेमाचे प्रतिक ताजमहाल एकत्र पाहिले. यासोबतच त्यांनी लग्न करण्याचा निर्णयही घेतला. पवनने सांगितले की, त्याच्या कुटुंबीयांना कोणताही आक्षेप नव्हता. लग्नाच्या कार्यक्रमामुळे पवनच्या घरात आनंदाचे वातावरण होते. हळद आणि मंडपाच्या कार्यक्रमानंतर दोघांनी हिंदू रितीरिवाजांनुसार मोठ्या थाटामाटात लग्न केले.

क्रिस्टन लिवर्ट प्रथम आग्रा येथे पोहोचली आणि नंतर अवगडला आली, जिथे दोघांनी जलसर रोडवर असलेल्या प्रेमा देवी शाळेत लग्न केले. वडील पितम सिंह यांनी सांगितले की, मुलांच्या आनंदातच आमचा आनंद आहे.

आम्ही या लग्नाशी पूर्णपणे सहमत आहोत. दुसरीकडे परदेशातून वधू आल्याची बातमी संपूर्ण परिसरात पसरली आणि दोघांचे लग्न पाहण्यासाठी अनेक लोकांनी गर्दी केली. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे.

# सूनबाई सासूला करायला लावणार 'मुजरा'



सध्या झी मराठीवर 'अग अग सुनबाई काय म्हणता सासुबाई' या मालिकेने प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. कारण या मालिकेत सासू-सुनेची आंबट गोड केमिस्ट्री मांडली आहे. या मालिकेत अभिनेत्री स्वानंदी टिकेकर सुनेच्या तर सासूच्या भूमिकेत सुकन्या मोने यांची जुगलबंदी बघायला मिळत आहे.

आजच्या आधुनिक काळात, सासू-सूने मधील नातं, एकमेकींशी कधी भांडत तर कधी एकमेकींना चिमटे काढत कसं बहरत जातं, याचा धमाल प्रवास ' मालिकेत पाहतोय. सासू सुनेच नातं असं आहे की तुझं माझं जमेना आणि तुझ्या विना करमेना. असच काहीतरी या दोघांच्या नात्यात आहे.

झालं असं की, या मालिकेत सासु सुनेच एकमेकांशी पटत नाही पण जेव्हा त्याच्या विरुद्ध गोष्टी होतात तेव्हा दोघी एकत्र होतात. जेव्हा अंकिताला समजते आपल्या सासऱ्यांचं आपल्या सासूपेक्षा अभिनेत्री रेखावर प्रेम आहे. आणि जेव्हा अंकिताला सांगते तेव्हा सासु म्हणते या रेखा समोर माझं काही चालत नाही. हे ऐकताच सुनबाई सासुबाईच्या मदतीला येते आणि एक प्लॅन करते अन् सासूला रेखा सारखा लूक देते.

झी मराठीवरील महारविवारी करणार हा भाग पाहायला मिळणार आहे. शंतनुने सासुला लाल रंगाचा अनारकली ड्रेस घालून अभिनेत्री रेखा सारखा लुक केला आणि मुजरा सारख वातावरण केलंय. सासुला सासऱ्यासमोर 'दिल चीज हे क्या ' या गाण्यावर मुजरा केला आहे. सुकन्या मोघे यांनी देखील मस्त मुजरा सारखी अदा देऊन मुजरा केला आहे.अगं अगं सूनबाई, काय म्हणता सासूबाई? मालिकेचा हा महाएपिसोड 29 जानेवारी, रविवार दु. 12 आणि रात्री. 9 वा. झी मराठीवर प्रेक्षकांना पाहायला मिळेल. या हलक्या फुलक्या मालिकेत धम्माल कॉमेडी असून मालिका प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे.

# अलका याज्ञिक यांचा 'यूट्यूब'वरही डंका!

बॉलिवूडमधील पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांच्या सुरेल आवाजाने तर सर्वांनाच वेड लावलं आहे. मग तो काळ ९० चे दशक असो किंवा आजचा काळ असो त्यांची क्रेझ अजुनही कायम आहे. त्यांच्या गाण्यांचे अनेक चाहते आहेत. आवाजाच्या जोरावर अलका याज्ञिकने चाहत्यांच्या मनावर राज्य केले आहे. आज त्यांनी यूट्यूबवरही राज्य केले आहे.अलका याज्ञिक या 14.8 बिलियन स्ट्रीम्ससह यूट्यूबवर सर्वाधिक ऐकलेली गेलेली गायिका बनल्या आहे.

होय, गेल्या 12 महिन्यांत अलका याज्ञिक यांची गाणी सर्वाधिक वेळा ऐकण्यात आली आहे, ज्यामुळे त्या 2022 मध्ये जगातील सर्वाधिक ऐकल्या जाणाऱ्या गायिका बनल्या आहेत.लिबर्टी गेम्सने जारी केलेल्या आकडेवारीत अलका याज्ञिकबाबत हा खुलासा करण्यात आला आहे. लिबर्टी गेम्सने प्रत्येक देशातील शीर्ष संगीत कलाकार शोधण्यासाठी यूट्यूबवरच्या संगीत व्हिडिओ चार्टवरील प्ले करण्यात आलेल्या गाण्याच्या संख्येंचे विश्लेषण केले आणि परिणाम आश्चर्यकारक होते.लिबर्टी गेम्सने जगभरातील चार्टवर अलका याज्ञिकचे नाव पहिले होते.गेल्या 12 महिन्यात अलका याज्ञिक यांना सर्वाधिक वेळा ऐकण्यात आले आहे, ज्यामुळे त्या 2022 मध्ये जगातील सर्वाधिक ऐकल्या गेलेल्या कलाकार बनल्या आहे.

या यादीत अलका याज्ञिक यांच्या व्यतिरिक्त इतर भारतीय गायकांनी आपले स्थान निर्माण केले आहे. अरिजित सिंग, कुमार सानू आणि उदित नारायण या गायकांनीही जगातील टॉप 10 सर्वाधिक ऐकलेल्या कलाकारांच्या यादीत आपले स्थान निर्माण केले आहे.

अलका याज्ञिकच्या टॉप गाण्यांबद्दल बोलायचे तर, उदित नारायण आणि कुमार सानू सारख्या प्रसिद्ध गायकांनी गायलेल्या त्याच्या सदाबहार गाण्यांचा समावेश आहे. तिच्या हिट लिस्टमध्ये 'मेरा दिल भी कितना पागल है', 'टिप टिप बरसा पानी', 'ए मेरे हमसफर', 'कुछ कुछ होता है' यासारख्या काही ब्लॉकबस्टर गाण्यांचा समावेश आहे.



# हीच खरी अप्सरा... सोनालीचा नवा लूक पाहून चाहत्यांनी केलं कौतुक



अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने तिच्या अभिनयाने आणि नृत्याने सर्वांच्याच मनात स्वतःचं हक्काचं स्थान मिळवलं आहे. सोनाली कुलकर्णी सोशल मीडियावर सुद्धा खूप सक्रिय असते. ती अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर शेअर करत नेहमीच चाहत्यांचं लक्ष वेधून घेते. सोनाली वारंवार आपल्या वेगवेगळ्या लूकमधील फोटो तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत असते.अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने तिच्या अभिनयाने आणि नृत्याने सर्वांच्याच मनात स्वतःचं हक्काचं स्थान मिळवलं आहे.सोनाली कुलकर्णी सोशल मीडियावर सुद्धा खूप सक्रिय असते.सोनाली अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर शेअर करत नेहमीच चाहत्यांचं लक्ष वेधून घेते.सोनाली वारंवार आपल्या वेगवेगळ्या लूकमधील फोटो तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत असते.सोनालीचा ब्यूटीफुल लूक पाहून चाहते लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. सोनालीचे सोशल मीडियावर लाखो चाहते आहेत.

# झी टॉकीजतर्फे दिमाखात रंगला 'महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण' पुरस्कार सोहळा




कोण होणार महाराष्ट्राचा फेव्हरेट ही टॅगलाईन गेल्या महिन्याभरापासून मनोरंजन विश्वासह सोशल मीडियाच्या जगात खूपच चर्चेत होती . सिनेमा, अभिनेता, अभिनेत्री, गायक, गायिका, संगीतकार, दिग्दर्शक, खलनायिका, खलनायक यासह १२ विभागातील महाराष्ट्राचा फेव्हरेट कलाकार निवडला तो प्रेक्षकांच्या पसंतीने . उत्सुकतेचा कळस गाठलेला हा सोहळा सेलिब्रिटींच्या उपस्थितीत अत्यंत दिमाखात पार पडला आकर्षक ड्रेसिंग, स्टायलिश फॅशन अशा लुकमध्ये झी टॉकीजच्या " महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण? "या पुरस्कार सोहळ्यात सेलिब्रिटींनी लक्ष वेधून घेतले. " महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण? " हा सोहळा १२ फेब्रुवारी ला दुपारी १ वाजता आणि संध्याकाळी ७ वाजता झी टॉकीज वाहिनीवर प्रदर्शित केला जाणार आहे . १५ डिसेंबरला, महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण या पुरस्कारांची नामांकने मोठ्या दणक्यात जाहीर करण्यात आली होती . त्यानंतर प्रेक्षकांच्या पसंतीसाठी वोटिंग लाईन्स सुरू करण्यात आली होती.

# ‘तर न्यूझीलंड-दक्षिण आफ्रिका संघावर बंदी घाला...’

## भारताच्या बचावासाठी पाकिस्तानी खेळाडू उतरला मैदानात

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाचा पराभव झाला. टीम इंडियाला मालिकेत परतण्याची संधी आहे, अजून दोन सामने बाकी आहेत आणि दोन्ही जिंकून टीम इंडिया मालिकाही जिंकू शकते. भारतीय संघाच्या नजरा आयसीसी ट्रॉफीवर खिळल्या आहेत. अशात पाकिस्तान्या माजी क्रिकेपटूने कामरान अकमलने टीम इंडियाबाबत एक मोठे वक्तव्य केले आहे.**

टीम इंडिया द्विपक्षीय मालिका जिंकते, पण आयसीसी ट्रॉफीमध्ये पराभूत होते, असा प्रश्न अनेकवेळा उपस्थित झाला आहे. तसंच टीम इंडियाला आयसीसी ट्रॉफी जिंकण्यासाठी योग्य म्हटलं जात नाही, यावर पाकिस्तानचा माजी यष्टीरक्षक कामरान अकमलने प्रश्न उपस्थित केला आहे.कामरान अकमल एका कार्यक्रमात म्हणाला की, ”लोक बोलत आहेत की भारताने १० वर्षांपासून आयसीसी ट्रॉफी जिंकली नाही. तुम्ही प्रत्येक स्पर्धा जिंकू शकत नाही. आयसीसी ट्रॉफी जिंकणे हाच एकमेव निकष असेल, तर न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिकेसारख्या संघांवर बंदी घालायला हवी.”

न्यूझीलंडच्या नावावर फक्त दोन आयसीसी विजेतेपद आहेत. त्यांनी २००० मध्ये स्टीफन फ्लेमिंगच्या नेतृत्वाखाली आयसीसी नॉकआउट ट्रॉफी जिंकली. त्यानंतर जून २०२१ मध्ये केन विल्यमसनच्या नेतृत्वाखाली WTC फायनल जिंकली. हे दोन्ही विजय भारताविरुद्ध मिळवले आहेत.



टीम इंडियाने शेवटची आयसीसी ट्रॉफी २०१३ साली जिंकली होती, जेव्हा महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. त्यानंतर वनडे विश्वचषक असो की टी-२० विश्वचषक, प्रत्येक वेळी टीम इंडियाचा पराभव झाला आहे.

भारताला आता एकदिवसीय विश्वचषक मायदेशात खेळायचा आहे, जिथे टीम इंडियाला ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये यजमानपद भूषवायचे आहे. येथे संघाला आयसीसी ट्रॉफीचा दशकभराचा दुष्काळ संपवण्याची संधी असेल. सध्या टीम इंडिया न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मालिका खेळत आहे. या मालिकेनंतर ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी आणि एकदिवसीय मालिका खेळायची आहे.



## नो बॉल 'किंग' अर्शदीप सिंग! शेवटच्या षटकात दिल्या 27 धावा

**मुंबई :** फिरकीस साथ देणाऱ्या खेळपट्टीचा भारतीयांपेक्षा न्यूझीलंडनेच अधिक फायदा घेतला आणि पहिला ट्वेंटी-20 सामना 21 धावांनी जिंकला. पॉवरप्लेमध्ये सूर्यकुमारला सँटनरने एक षटक निर्धाव टाकले, यावरून न्यूझीलंड फिरकीचे वर्चस्व अधोरेखित झाले.

वॉशिंग्टन सुंदरचा अपवाद वगळता भारतीय गोलंदाजांचे अपयश, त्यात अर्शदीपने अखेरच्या षटकात दिलेल्या तब्बल 27 धावा दिल्या. अर्शदीपच्या या महागड्या षटकाने न्यूझीलंडला 176 धावांपर्यंत मजल मारली. नंतर भारतीय संघाला 9 विकेट्सवर केवळ 155 धावा करता आल्या आणि सामना 21 धावांनी गमवावा लागला.अर्शदीप सिंगचे अखेरचा षटक भारताला फारच महाग पडले. न्यूझीलंडच्या डावाच्या 20व्या षटकात अर्शदीप सिंगने पहिला चेंडू नो-बॉल टाकला. नो-बॉल टाकल्यानंतर अर्शदीपवर दबाव स्पष्ट दिसत होता आणि मग फ्री-हिट चेंडूवर मिशेलने षटकारही ठोकला. पुढच्या दोन चेंडूत त्याने एकूण दहा धावा दिल्या. नंतर अर्शदीप सिंगने थोडेसे पुनरागमन करत डॅरिल मिशेलला शेवटच्या तीन चेंडूत केवळ सहा धावा करू दिल्या.

# अरेना सबलेंका ऑस्ट्रेलियन ओपनची नवी राणी!

## जोरदार पुनारागमन करत जिंकले पहिले वहिले ग्रँडस्लॅम

।भुवनेश्वर।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलियन ओपन 2023 महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात अरेना सबलेंकाने एलेना रबकिनाचा 4-6, 6-3, 6-4 असा पराभव करत आपले पहिले वहिले ग्रँड स्लॅम जिंकले. रशियाच्या विम्बल्डन विजेत्या रबकिनाने पहिला सेट जिंकत सामन्यावर पकड निर्माण केली होती. मात्र अरेनाने जोरदार पुनरागमन करत पुढचे दोन्ही सेट जिंकून आपले ग्रँडस्लॅम जिंकण्याचे स्वप्न साकार केले.

बेलारूसच्या अरेना सबलेंकाने ऑस्ट्रेलियन ओपन जिंकताच जागतिक रँकिंगमध्ये दुसऱ्या स्थानावर झेप घेतली. आपले पहिले ग्रँड स्लॅम जिंकल्यानंतर अरेना म्हणाली की, 'मी अजून थरथरत आहे. मी खूप नर्व्हस आहे. माझी टीम, माझी वेडी टीम असं मी म्हणतो. आम्ही गेल्या वर्षभरापासून खूप चढ उतारातून गेलो आहेत. आम्ही खूप कष्ट केले आहेत. त्यामुळे या ट्रॉफीचे खरे मानकरी तुम्ही आहात. माझ्यापेक्षा तुम्ही खूप महत्वाचे आहात.'अरेना सबलेंका ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. तिने आतापर्यंतच्या स्पर्धेत एकही सेट गमावलेला नाही. तिने एडिलेड इंटरनॅशनल स्पर्धा जिंकून 2023 चा हंगामाची सुरूवात केली.

तिने आतापर्यंत 11 सामने सरळ सेटमध्ये जिंकले होते. सबलेंकाने सेमी फायनलमध्ये मागदा लिरेट्टेचा 7-6, 6-2 असा पारभव करत अंतिम फेरी गाठली होती.

त्यापूर्वी तिने टेरेझा आणि शेल्बे यांचा पहिल्या दोन फेरीमध्ये सरळ सेटध्ये पराभव केला होता. ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेचा अंतिम सामना मात्र तिला सरळ सेटमध्ये जिंकता आला नाही. तिने रबकिनाचा 4-6, 6-3, 6-4 असा पराभव केला.



# जोकोविच-त्सित्सिपास अंतिम लढत!

## महिलांमध्ये रायबाकिनाला सबलेन्काचे आव्हान

।मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

वर्षातील पहिल्या ग्रँडस्लॅम स्पर्धेतील पुरुष एकेरीमधील आणि महिलांच्या एकेरीमधील अंतिम स्पर्धक ठरले आहेत. पुरुषांच्या विजेतेपदासाठी नोवाक जोकोविच आणि स्टेफानोस त्सित्सिपास यांच्यात सामना होणार आहे; तर महिलांच्या ऑस्ट्रेलियन ओपन एकेरीच्या विजेतेपदासाठी कझाकस्तानच्या २२ व्या मानांकित एलेना रायबाकिना आणि बेलारूसच्या पाचव्या मानांकित अरिना सबलेन्का यांच्यात लढत होणार आहे.

जोकोविचने काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात अमेरिकेच्या टॉमी पॉलचा ७-५, ६-१ आणि ६-२ असा सरळ सेटमध्ये सहज पराभव केला आणि दहाव्यांदा ऑस्ट्रेलियन ओपन



ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. जोकोविचला ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये खेळायला प्रचंड आवडते हे त्याचा आजचा खेळ बघून पुन्हा एकदा लक्षात आले. त्याने अमेरिकेच्या २५ वर्षीय पॉलला संपूर्ण सामन्यात दबावाखाली आणले होते.आपल्या अनुभवाच्या जोरावर जोकोविचने या सामन्यात आक्रमक खेळ करत फक्त आठच गेम गमवले. पहिल्या सेटमध्ये जोकोविचने ३-० अशी आघाडी घेतली असताना देखील पॉलने पुनरागमन केले, मात्र शेवटी सर्बियाच्या खेळाडूने पहिला सेट ७-५ असा खिशात टाकला.